MHLA090012342026

## निशाणी क्र.१ वरील आदेश

१. अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे पती नामे **निर्भय पि.अशोकराव शेळके** वय वर्ष ४१ हे दि.०३/०३/२०२६ रोजी आशियन इन्स्टिटट्युट ऑफ गॅस्ट्रोइंट्रॉलॉजी प्रा.लि. सोमाजीगुडा, जि.हैद्राबाद तेलंगणा येथे मरण पावले आहेत. अर्जदार यांनी वारस नोंदी होण्याकामी अर्ज केला असता त्यांच्याकडे वारस प्रमाणपत्राची मागणी करण्यात आली. त्यामुळे त्यांनी सदरचा अर्ज सादर केलेला आहेत.

३. अर्जदार यांनी **निर्भय पि.अशोकराव शेळके** त्यांच्या मृत्यूचे प्रमाणपत्र नि.क्र.१२ वर दाखल केलेले आहे. अर्जाच्या कामी जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आलेली असून ती नि.क्र.१० वर दाखल करण्यात आलेली आहे. नोटीस प्रसिध्द झाल्यापासून आजपर्यंत कोणीही आपली हरकत या अर्जाला नोंदविली नाही. या अर्जाच्या कामी अर्जदार यांच्या वतीने अर्जदार यांनी आपले पुराव्याचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.११ वर दाखल केलेले आहे.

४. अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्यावरून **निर्भय पि.अशोकराव शेळके** वय वर्ष ४१ हे दि.०३/०३/२०२६ रोजी मरण

पावले. त्यांना अर्जदार क्र.१ जयमाला भ्र.अशोक शेळके वय वर्ष ५६ ही आई म्हणून, अर्जदार क्र.२ प्रियंका भ्र.निर्भय शेळके वय वर्ष ३४ ही विधवा पत्नी म्हणून, अर्जदार क्र.३ अंकिता पि.निर्भय शेळके वय वर्ष १४ ही मुलगी म्हणून वारस असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे पुढील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. **निर्भय पि.अशोकराव शेळके** वय वर्ष ४१ हे दि.०३/०३/२०२६ रोजी मरण पावले. त्यांना अर्जदार क्र.१ जयमला भ्र.अशोक शेळके वय वर्ष ५६ ही आई म्हणून, अर्जदार क्र.२ प्रियंका भ्र.निर्भय शेळके वय वर्ष ३४ ही विधवा पत्नी म्हणून, अर्जदार क्र.३ अंकिता पि.निर्भय शेळके वय वर्ष १४ ही मुलगी म्हणून सरळ वारस असल्याचे जाहीर करण्यात येते व त्याप्रमाणे दाखला अदा करण्यात यावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.06.09 16:15:54 +0530

**ठिकाणःउदगीर** **(श्री. व्ही. आर. घराळ)**

**दि.०९/०६/२०२६** **सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,उदगीर.**